# दहापैकी चार स्थानके सज्ज

## भूमिगत मेट्रो मार्गिकेचा पहिला टप्पा डिसेंबरमध्ये सुरू होण्याची आशा

**म. टा. खास प्रतिनिधी**

**मुंबई :** राज्यातील पहिली भूमिगत मेट्रो मार्गिका असलेल्या आरे-कफ परेड या मेट्रो ३ मार्गिकेवरील पहिल्या टप्प्यातील चार स्थानके जवळपास सज्ज झाली आहेत. त्यामध्ये विमानतळ ते आरे या दरम्यानच्या स्थानकांचा समावेश आहे. अशा दहा स्थानकांचा पहिला टप्पा डिसेंबरपासून सुरू करण्याचे उद्दिष्ट असताना चार स्थानके सज्ज झाली आहेत.

मेट्रो ३ ही मार्गिका मुंबईच्या पश्चिम उपनगरांसह दक्षिण मुंबई बेट व उत्तर मुंबईला जोडणारी आहे. या ३३ किलोमीटर लांबीच्या मार्गिकेत एकूण २६ भूमिगत व एका जमिनीवरील स्थानकाचा समावेश आहे. मार्गिकेचा पहिला टप्पा आरे ते बीकेसी डिसेंबर २०२३पासून सुरू करण्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी याआधीच केली आहे. त्यादृष्टीने पहिली चार स्थानके सज्जतेच्या अंतिम टप्प्यात आहेत.

संबंधितांनी दिलेल्या माहितीनुसार, या भूमिगत मार्गिकेतील उत्तरेकडील पहिले स्थानक सारिपूतनगर (आरे) आहे. मात्र ते जमिनीवर आहे. त्यानंतर सर्व स्थानके भूमिगत असून त्यातील काही ठिकाणी २० मीटर खोलीपर्यंत बांधण्यात आले आहेत. प्रत्येक स्थानकाचा पहिला माळा हा जमिनीपासून सरासरी १२ ते १५ मीटर खोलीवर आहे. याच पद्धतीने बांधण्यात आलेल्या सीप्झ, एमआयडीसी, मरोळ नाका व विमानतळ टर्मिनल २ या उत्तरेकडील चार स्थानकांची उभारणी झाली आहे. ही स्थानके जवळपास पूर्ण झाली आहेत.

या स्थानकांत आंत जाण्यासाठी सरकते जिने असून जमिनीखाली सातत्याने ताजी हवा मिळावी यासाठी मोठे पंखे बसविण्यात आले आहेत. प्रामुख्याने या चार स्थानकांचे हे पंखे पूर्ण रूपात कार्यान्वित झाले आहेत. त्याखेरीज फलाट सुरक्षित करण्यासाठी फलाट व रूळ यादरम्यान 'प्लेटफॉर्म स्क्रीन डोअर्स' पद्धतीने मोठी काच बसविण्यात आली आहे. या काचेला असलेले दरवाजे केवळ गाडी आली की उघडले जातील. तेदेखील बांधून सज्ज आहेत. अशाप्रकारे या चार स्थानकांची उभारणी पूर्ण झाली आहे.

आरे ते विमानतळ टर्मिनल २ हे अंतर जवळपास साडे चार किलोमीटर आहे. त्यादरम्यानची ही स्थानके बांधून पूर्ण झाली असताना याच स्थानकांदरम्यान मेट्रोतील गाड्यांची चाचणी झाली होती.

### पहिला टप्पा

- आरे, सीप्झ, एमआयडीसी, मरोळ नाका, विमानतळ टर्मिनल २, सहार रोड, देशांतर्गत विमानतळ, सांताक्रूझ, विद्यानगरी व बीकेसी या स्थानकांचा पहिल्या टप्प्यात समावेश आहे.
- एकूण नऊ गाड्या या टप्प्यात चालविल्या जाणार असून त्यांच्या फेऱ्या किती असतील, हे अद्याप निश्चित नाही.
- डिसेंबर २०२३पासून ही मार्गिका सुरू करण्यासाठीची तयारी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने केली आहे.




- विमानतळ ते आरे दरम्यानच्या स्थानकांचा समावेश
- साडेचार किमीचा मार्ग
- दहा स्थानकांचा पहिला टप्पा डिसेंबरपासून





